साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

HELLO NEWS

संपादक : विशाल वामन पाटील

* सातारा * वर्ष १ * अंक ५ * मराठी * सोमवार २९ जून ते ५ जुलै २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 5 * Marathi * Monday 29 Jun to 5 Jully 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

# कराडच्या मेहेरबानांची काश्मिरमध्ये ढिशुम ढिशुम...

## काश्मिरच्या थंडीत वातावरण टाईट : यशवंत विचारांना फाट्यावर मारत पालिका निवडणुकीचे काढले उट्टे

**विशाल पाटील (हॅलो न्यूज)**

कराड पालिकेच्या मेहेरबानांची काश्मीरच्या गुलाबी थंडीत चांगलीच ट्रीप झाली. बर्फाचा थंडागार वर्षाव, रंगबेरंगी फुले, पहलगाम, गुलमर्ग चा दौरा अन् वेगवेगळे पेये मग काय सगळं कसं एकदम झिंग...झिंग...झिंगाटच की राव. कसली जबरदस्त ट्रीप त्या ट्रीपला सोशल मिडियावर हवा करण्यासाठी हिंदी गाण्याच्या तालावरील रिल्स जणू काही आपण रिल्सस्टार. सगळं एकदम फिल्मी स्टाईल सुरू होत. आता फिल्मी सगळं म्हटल्यावर आता आपल्याला हिरोगिरी केल्याशिवाय राहणार हाय व्हय. मग काय रं भावा आपल्याला कोण- कोण नडलं यांचा पोटात एवढं दिवस राहिलेला इषय निघल्याशिवाय राहणार थोडीचं. मग जसा- जसा पॅक पोटात जात होता, तसा तसा पोटात साठलेलं, ओठावर येत होतं. मग काय सुरू झाली ढुशुम...ढुशुम...ढुशुम...फाईट अन् सगळं एकदम वातावरण टाईट.

तर कराडकरांनो इषय कसा हाय, काही दिवसापूर्वीच आपल्या पालिकेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकात जसं आपल्या राज्यात फोडाफोडीच, उड्या मारामारीचं राजकारण झालं. तसं आपल्या कराडच्या पालिका निवडणुकीत झालं, सगळ्यांनी पाहिलं. पण आपल्याला उघड घडलं तेवढं दिसलं. पण आतन जे काय घडलं ते नाही दिसलं. आतन घडत होत तेव्हा रिकामं पोट असल्याने ते पचवून ठेवलं होत. कारण निवडणूक सुरू होती, नेत्यांचा आदेश व्हता, चुकीचं काय करायचं नाही. कराडच्या मतदाराने आपल्याला वाईट म्हटलं नाय पाहिजे, मत मिळणार नायतं




अस वागायचं नाय. आपण कसं पण असूदे, मात्र आपण सोज्वळ दाखावयचं. कराडमध्ये आपल्या एवढं कोणी शांत जणू नाही. आपल्याला शांततेचं नोबेल दिलं पाहिजे अस वागायचं, असा आदेश निवडणुकीत व्हता. आता झाल्या निवडणुका पाच वर्ष कोण मेहेरबान पदावरन आपल्याला हलवू शकत नाय. तेव्हा पोटात साठलेलं बाहेर काढण्याची येळ आली असून अडीच, तीन हजार किलोमीटरवर काय घडलं, कोणाला काय समजणार न्हाय. असा इचार झाला पक्का अन् मग नुसतं ढिशुम...ढिशुम..ढिशुम सुरू झाली.

आता सविस्तर इषय समजून घेवूया नक्की काय झालं. एक नवखा नगरसेवक, दुसरा नवख्या नगरसेविकेचा पती अन् जेष्ठ पहिल्या फळीतील नव्याने समावेश झालेल्या पदाधिकारी आणि त्यांच्या माणसांची फाईट. ती कशी काय झाली. याविषयी कराडकरांच्यात चांगलीच चर्चा सुरू आहे. कराडच्या लोकशाहीचे धिंडवडे काश्मीरात निघताना जनतेची शक्ती ही कमी पडली ना राव. काय सागायचं सर्वपक्षीय ट्रीप, त्यात हा राडा जवळपास अर्धा तास सुरू व्हता ना. सुरूवात कोणी केली, कशी केली यावर मतमंतारे सुरू आहेत. मात्र, राडा झाला यावर आता काश्मीरच्या त्या हॉटेलातच नव्हं तर कराडकरांच्यातही एकमत झालं आहे.

विधान परिषदेचं मतदान झालं अन् त्याचदिवशी रात्री भरून ठेवलेल्या बॅगा उचलल्या आणि मेहेरबान थेट काश्मीरला

**भाऊंना अगोदरच कानकुन... अन् दौऱ्यापासन लांब**

काश्मीर दौरा त्यालाही स्पॉन्सर म्हटल्यावर सगळ्यांनी भरल्या की बॅगा. पण कस हाय आपल्यात लय भाऊ असे हायती. त्यांना कुठं, कधी जायचं यांची चांगल माहीती हाय. त्यामुळं राजकारणात त्यांनी योग्यवेळी टायमिंग साधत उडी घेतली. अन् काश्मीर दौऱ्याला कोण- कोण गडी हाय यांचा इचार केला. अन् दौऱ्यापासनं लांबच राहिले ना आपले भाऊ.

गेले की. कराडकरांना काही थांगपत्ता नाही ना. पण सोशल मिडियावर फेमस व्हायची संधी, कोणी कधी सोडली हाय का सांगा बर. इम्रान हश्मीच्या मर्डर चित्रपटातील गाण्याची चांगलीच भुरळ पहायला मिळाली. अमीर, शाहरूख खानच्या गाण्यांनी नुसता धुमाकूळ घातला. मग ऐ हसी वादिया, ऐ खुला आसमान गाण्यावर रात्रीची मैफील बसली. रात्रीची मैफिल बसली ती काय जणू स्वर्गातच बसलूया अस वाटू लागलं पण तिथं पोटात साठलेलं ढवळू लागलं.


पोटात साठलेलं ढवळू लागल्यानं काहीना कसंतरी होवू लागलं, मग ठरलं आपण आपलं आपल्या रूमवर जावूया. रूमवर गेल्यावर पोटातलं ढवळलेलं खवळू लागलं. खवळंलेलं आता बाहेर काढल्याशिवाय काय शांत होणार न्हाय, मग ठरलं चला पुन्हा मैफिलीच्या ठिकाणी अन् सुरू झाला ना. लोकशाहीच्या स्तंभातील पहिला म्हणजेच लोकप्रतिनिधीचा राडा. आता हा लोकशाहीला काळीमा फासणारा प्रकार कुणी थांबायचा म्हणून जनतेची शक्ती पुढे आली. पण काय सागायचं जनतेची शक्तीही अपुरी पडू लागली अन् झाली की ढुशुम...ढुशुम फाईट. यावेळी तिथं असणारी काही मेहेरबांनानी मज्जा घेतली, काहींनी सहभाग घेतला. काहींनी सोडवा सोडवीचा प्रयत्न केला पण अर्धा तास वातावरण एकदम टाईट ठेवत फाईटच फाईट की राव.

ए थांब तुला दाखवतो, दुसरा मी पण दाखवतो तर तिसरा म्हणे मी पण दाखवतो. नुसत्या दाखवतोनं वातावरण गरम झाल... एकदा का गरम वातावरण झाल्यानं, थंडीतल्या गर्मीत कुणाला राहवतय तवा. मग आपली पावर दाखवण्याची स्पर्धा सुरू झाली, कराडच्या मेहेरबांनानी वाखानातून सुरू झालेला वाद, बारा डबरीत जाळ अन् धूर काढू लागला. मंडईत नुसता पालिकेच्या मैदानात नुसता राडा- राडा, पाण्याच्या टाकीकडून पुढ सरकत सरकत दत्त चौकात आला ना राव. आता हे सगळं मी तुम्हाला कराड शहरात घेवून आलो बघा, पण हे घडत होत कुठं तर काश्मीरात ते पण गुलाबी थंडीत. कराडकरांच काश्मीरात तापमान वाढलेलं होत. सगळे पर्यटक थंडीत अन् कराडकर नुसते तापलेल्या तापमानात तिथं एसी पण काम करत नव्हता एवढा राडा. आता या राड्यात कुणाला फाईट, कुणाची टाईट हे मात्र आपण गुपित ठेवूया. कारण आताच्या मेहेरबांनाना दंड थोपटण्या पलीकड काही दिसत नसलं. तरी आपल कराड सुसंस्कृत, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराचं आहे. एवढचं तेव्हा आता जाणार का सगळे जण एकत्रित ट्रीपला ... काश्मीरला.

# अंधश्रध्दा निर्मूलन कायदा अन् डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या

**विशाल पाटील (हॅलो न्यूज)**

अंधश्रद्धा निर्मूलन म्हणजेच डॉ. नरेंद्र दाभोलकर हे समीकरण महाराष्ट्रात कायमस्वरूपी राहणार आहे. आधुनिक ज्ञान विज्ञानामुळे माणूस शिक्षित तर झाला पण सुशिक्षित आणि अंधश्रद्धा मुक्त झाला नाही. असे वारंवार डॉ. नरेंद्र दाभोलकर सांगायचे. याची उदाहरणे आजही पहायला मिळत आहेत. मुंबईतल्या एका सोसायटीत दोन - तीन दिवसापूर्वी अघोरी कृत्यांचा नमुना सीसीटीव्हीत कैद झाला अन् तो आख्या महाराष्ट्राने पाहिला. आपण विज्ञानाची सृष्टी घेतली पण विज्ञानाची दृष्टी घेतली नाही. आपण विज्ञानाची करणी घेतली, पण विचारसरणी घेतली नाही, असे डॉ. दाभोलकरांनी सांगत जो कायदा



अस्तित्वात आणण्यासाठी जीवनभर संघर्ष केला. त्याच्या या संघर्षाला त्यांच्या हत्येनंतर यश आले. महाराष्ट्रात

**(जागर..)**

जादूटोणाविरोधी कायदा आला. आता तो नेमका काय आहे, कोणकोणत्या गोष्टी येतो. सदरील फौजदारी कायदा २६ ऑगस्ट २०१३ रोजी अमलात आला.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पहिल्यांदा १९८९ मध्ये कायदा करण्यासाठीची मागणी केली. अनिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि अनिस यांनी या कायद्याच्या मसुदा तयार केला आणि महाराष्ट्रातल्या अनेक सरकारांकडे यासाठी पाठपुरावा केला तब्बल १४ वर्ष हे विधेयक अडकलं अंधश्रद्धा विरोधी कायदा असं मूळ नाव बदलून दरम्यानच्या काळात जादूटोणा विरोधी कायदा असं नाव देण्यात आलं. २०१३ सालच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान हे विधेयक मांडलं जावं असा डॉ. दाभोलकर आणि अनिसचा प्रयत्न होता. पण अधिवेशन संपेपर्यंत हे विधेयक मांडलं गेलं नाही. याच दरम्यान २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाली आणि २४ ऑगस्ट २०१३ ला महाराष्ट्र सरकारने याविषयीचा अध्यादेश काढला. २०१३ डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात आलं. विधानसभा आणि विधान परिषदेत विधेयक संमत झालं आणि वटहुकुमाचं कायद्यात रूपांतरण झालं. अशा प्रकारचा कायदा करणार महाराष्ट्र हे पहिलंच राज्य होतं. पण मूळ मसुद्यातल्या अनेक गोष्टी वगळण्यात आल्याने कायद्याची तीव्रता कमी करण्यात आल्याची टीका ही करण्यात आली. या कायद्याला राजकीय पक्ष उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी विरोध केला होता. या कायद्यात कोणकोणत्या गोष्टीचा समावेश आहे. याबाबत सविस्तर माहिती पुढील अंकात दिली जाईल.

## संपादकीय

# नक्की हिशोब कुणाचा होणार...शंभर मतफुटीचा

राज्यातील विधान परिषद निवडणूक पार पडली. महायुतीने महाविकास आघाडीचा सुफडासाफ केला. एकाही जागेवर महाविकास आघाडीला यश मिळाले नाही. यामुळे गावपातळीवर महाविकास आघाडीला चिंतनाची वेळ आली आहे. पक्ष संघटन, कार्यकर्ता बांधणी करावी लागणार आहे. यासाठी नव्या दमाच्या तरूणांना मोठी संधी असून ती महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दिली पाहिजे. या परिस्थितीवरून महायुती भक्कम होत असल्याचे चित्र पहायला मिळत असली तरी अंतर्गत धूसफूस, वादविवाद मोठ्या प्रमाणात वाढले असून नाशिक, साताऱ्यात पहायला मिळाले. साताऱ्यातून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेंनी महायुतीतील शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाईंना नक्की हिशोब करण्याचा इशारा दिला आहे. नक्की राजकारण झालं ते पहावूया...

नाशिक विधान परिषद मतदार संघातील महायुतीने शिवसेनेचा दत्तात्रय दराडे दिलेला उमेदवार अपक्ष भाजप बंडखोर गोकुळ गिते यांच्या खेळीने पराभूत झाला. या मतदार संघातील खेळी राज्याने पाहिली. मात्र, साताऱ्यातील इनसाईड स्टोरी राज्याने पाहिली नाही. कारण ती उघडपणे खेळी झाली नसल्याचे आरोप- प्रत्यारोप शिवसेना आणि भाजप मंत्र्यांकडून होवू लागले आहेत. विधान परिषद निवडणूक जाहीर झाल्यापासून साताऱ्यात जिल्हा परिषद निवडणूक आणि अध्यक्ष पदाच्या खेळीच्या राजकारण संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. या खेळीचे उट्टे राष्ट्रवादी- शिवसेना ही महायुतीतील मित्रपक्ष काढणार अन् भाजप उमेदवार अडचणीत येणार असे बोलले जात होते. परंतु, भाजपाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एन्ट्री करतील अन् पुन्हा भाजपाला पाहिजे तेच करतील, असा संदेश भाजप नेते, पदाधिकाऱ्याकडून दिला जात होता. अन् अखेर तसेच घडले, भाजपाने करून दाखवल्याने पुन्हा शिवसेना- राष्ट्रवादी चितपट झाली. तलवारी म्यान कराव्या लागल्या.

सातारा- सांगली दोन्ही जिल्ह्यातील मतदार मतदार विधान परिषदेला मतदान करणार असल्याने दगाफटका होण्याची भीती कायमच असते. गेल्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते स्व. पतंगराव कदम यांनी आपले बंधू माजी आमदार मोहनराव कदम यांना निवडून आणण्यासाठी संख्याबळ कमी असताना खेळी केली, त्यात ते यशस्वीही झाले हा इतिहास साक्षीला आहे. त्यामुळे भाजपाने त्यांची नोंद ठेवली होती. त्यातच जिल्हा परिषद राड्यात मंत्री शंभूराज देसाई, मंत्री मकरंद पाटील यांच्यासोबतचा प्रकार विधिमंडळात पोहचल्याने कोण- कुणाचे उट्टे काढणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. भाजप विरोधात दोन्ही मित्रपक्ष महाविकास आघाडीला मदत करतील असेही बोलले जात होते. परंतु, बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात अशी परिस्थिती पहायला मिळाली.

अखेरच्या दोन दिवसात दोन्ही मित्रपक्षाच्या तलावारी म्यान झाल्या, महायुती धर्म पाळण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले. अन् भाजपाचे घोडे गंगेत न्हाले. संख्याबळाच्या जोरावर आणि पक्षाच्या वरिष्ठाच्या खेळीवर धैर्यशील कदम आमदार झाले. नवनिर्वाचित आमदार स्व. यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यासाठी आले. तेव्हा साहजिकच त्यांना उमेदवारी मिळवून विजयी करण्यात अग्रेसर असणारे ग्रामविकास मंत्री सोबत होते. त्यांना महायुतीतल १०० मतफुटीचा मुद्दा चांगलाच जिव्हारी लागला असून त्यांचा रोख मित्रपक्षाकडेच गेला. नुसता गेला नाही. तर त्यांनी आम्ही हिशोबाला पक्के असून १०० मतफुटीचा नक्की हिशोब होणार असा इशाराच दिला आहे. तेव्हा पाहूया आता साताऱ्यातील महायुतीतील राजकारण कुठे, कसे जाते.

# महाराष्ट्र कृषी दिन

शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषी तज्ञ व प्रगतशील शेतकरी, कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरी केली जाते.पंचायत राज, रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार आणि शेतकऱ्यांचा राजा असणाऱ्या वसंतराव नाईक यांच्या कार्याबद्दल थोडक्यात.



कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून या दिवसाला अत्यंत महत्त्व आहे. भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला होता. तेव्हापासून १ जुलैला शासकीय स्तरावर सर्वत्र हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो.

राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्र कृषी दिन किंवा महाराष्ट्र कृषी दिवस साजरा केला जातो. वसंतराव नाईकांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनकही म्हटले जाते.

त्यांच्या जन्मदिवस हा महाराष्ट्र कृषी दिवस म्हणून साजरा केला जातो. वसंतराव फुलसिंग नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी झाला. १९६३ ते १९७५ या काळात ते राज्याचे मुख्यमंत्रीही होते. जेव्हा पासुन वसंत नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हापासुन त्यांनी कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी सदैव योगदान दिले असे सांगितले जाते.

शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषी तज्ञ व प्रगतशील शेतकरी अशीही त्यांची ओळख आहे. वसंतराव नाईक यांचे भारतीय राजकारण, लोकशाही सक्षमीकरण व विशेषतः कृषी औदयोगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना महानायक म्हणूनही आदराने संबोधले जाते.

शिवाय भारताचे राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. प्रणव मुखर्जी यांनी ''वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे.'' या शब्दात नाईकांचे गौरव केले आहे. तसेच थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.

म्हणून, भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये घोषित केला गेला.

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. महाराष्ट्राला देशातील प्रमुख उत्पादक राज्य म्हणून ओळखले जाते. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावरील एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा म्हणूनही त्यांची ओळख आहे.

वसंतरावांनी, भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय, पहिल्यांदाच चार कृषी विदयापिठाची स्थापनाही त्यांनी केली.

१९७२ सारख्या भीषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी शेतकरी आत्महत्या हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते.

# कराड आरटीओची दुचाकींसाठी नवी मालिका सुरू

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड आणि पाटण तालुक्यात नव्याने नोंदणी होणाऱ्या दुचाकी वाहनांसाठी उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) 'एमएच-५० एबी' या नवीन क्रमांक मालिकेला सुरुवात केली आहे. ०००१ ते ९९९९ या क्रमांकांचा समावेश असलेली ही मालिका बुधवार २४ जूनपासून उपलब्ध होत असून, आकर्षक नोंदणी क्रमांक मिळविण्यासाठी वाहनधारकांकडून अर्ज स्वीकारले जाणार असल्याची माहिती उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय इंगवले यांनी दिली.




दरम्यान, आकर्षक क्रमांक आरक्षित केल्यानंतर संबंधित वाहनाची नोंदणी १८० दिवसांच्या आत करणे बंधनकारक असल्याचे आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आवडीचा वाहन क्रमांक मिळविण्याची संधी वाहनधारकांना उपलब्ध झाली आहे.

# कराडातील राजश्री शाहू महाराजांच्या स्मारकाचे सुशोभिकरण करणार : राजेंद्रसिंह यादव

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड येथील छत्रपती शाहू महाराज चौकात असलेल्या राजश्री शाहू महाराज यांच्या स्मारकाचे नूतनीकरण तसेच शहरातील सर्व महापुरूषांच्या पुतळयाची नित्य पुजा केली जाईल, अशी पालिकेतर्फे सोय करणार असल्याचे प्रतिपादन कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी केले.

छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कराडातील शाहू महाराजांच्या पुतळयास शुक्रवारी विविध मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जयंतकाका पाटील, अल्ताफभाई शिकलगार, नरेंद्र लिबे, निशांत ढेकळे, प्रितम यादव, किर्तीका विभुते, सुलोचना पवार , प्रशांत यादव, लोकप्रतिनिधी व नागरीक उपस्थित होते.

छ. शाहू महाराज जयंतीनिमित्त मान्यवरांकडून अभिवादन



माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील म्हणाले की, राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी महाराष्ट्राला समतेचा, सर्व जाती धर्मांना बरोबर घेवून जाण्याचा व समाजातील सर्व गोरगरीबांना शिक्षण देण्याचे काम केले तोच आदर्श घेवून राज्य व देशाची वाटचाल सुरू आहे.

# शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी; कृषी विभागाचे आवाहन

**सातारा, जिमाका**

एल निनोच्या पार्श्वभूमीवर या वर्षी मान्सूनवर व हवामानावर विपरीत परिणाम दिसून येत आहे. त्यामध्ये तापमान वाढ, पावसातील खंड, अति पाऊस, इ. मुळे पिकांवर कीड रोगांचा उद्रेक होऊ शकतो. मागील काही वर्षांपासून सोयाबीन पिकावरील येलो मोझाईक, गोगलगाय, लष्करी अळी, हुमणी किडीच्या तसेच विविध पिकांवरील मर रोग प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान होऊन उत्पादनावर परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे कीड रोगाचे नियंत्रण करण्यासाठी एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. कीड व रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करुनच पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा कृषि अधीक्षक भाग्यश्री फरांदे यांनी केले आहे.

बीजप्रक्रिया म्हणजे बियाणे पेरण्यापूर्वी त्याला विविध बुरशीनाशके, कीटकनाशके व जैविक, औषधे लावण्याची प्रक्रिया होय. ज्यामुळे मातीतून आणि बियाण्यातून पसरणाऱ्या रोगांपासून पिकांचा बचाव होतो. बीजप्रक्रीया ही अतिशय कमी खर्चाची पण अत्यंत प्रभावी पद्धत आहे.

बीजप्रक्रिया केल्याने बियाणे व पिकांचे कीड व रोगांपासून संरक्षण होते, उगवण क्षमता, अंकुरण क्षमता सुधारते. रोपे अधिक निरोगी व जोमदार होतात. खत उपलब्धता होते व त्याचा कार्यक्षम वापर होतो. हवामानातील बदलांना तसेच कीड रोगांना तोंड देण्याची पिकांची क्षमता वाढते.

* Satara * Vol- 5 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी नामदेवराव पाटील यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात



**सातारा (हॅलो न्यूज)**

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नामदेवराव पाटील (आप्पा) यांचा पदग्रहण व सत्कार सोहळा हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण (बाबा) यांच्या हस्ते नामदेवराव पाटील यांनी जिल्हाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश प्रवक्ते हनमंत पवार, काँग्रेसच्या ओबीसी विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भानुदास माळी, जिल्हा परिषद सदस्या सौ. सुनंदा पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अजितराव पाटील व राजेंद्र शेलार, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, रणजितसिंह देशमुख, महिला जिल्हाध्यक्षा सुषमा राजेघोरपडे, श्रीकांत चव्हाण, प्रदीप जाधव, अशोकराव पाटील, बाबुराव पवार, बाबासाहेब कदम, इंद्रजीत चव्हाण, संजय तडाखे, जयदीप शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी अजितराव पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धैर्यशील सुपले यांनी केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, काँग्रेस पक्ष हा देशाच्या संविधानिक मूल्यांचा आणि लोकशाहीचा रक्षक आहे. आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शेतकरी, उद्योग आणि सामाजिक सलोखा यांसारखी अनेक गंभीर आव्हाने आहेत. अशा काळात काँग्रेसची संघटना अधिक सक्षम करणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे. सातारा जिल्ह्याला काँग्रेसचा वैभवशाली वारसा लाभला असून नामदेवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी प्रत्येक गावात पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्ह्यातील काँग्रेसच्या एकमेव जिल्हा परिषद सदस्या सौ. सुनंदा पाटील यांचा सत्कार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हनमंत पवार यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भानुदास माळी यांचा युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नामदेवराव पाटील (आप्पा) यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास मी कामातून सार्थ ठरवेन. आदरणीय पृथ्वीराज बाबा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संघटन वाढविणे आणि प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्ष अधिक मजबूत करणे, हेच माझे ध्येय राहील.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील काँग्रेस पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयूआय, सेवा दल तसेच हजारो कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमातून सातारा जिल्ह्यात काँग्रेस संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अनुष्का वाकुर्डे हिचे चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत उल्लेखनीय यश

**उंडाळे (हॅलो न्यूज)**

कराड तालुक्यातील सवादे येथील अनुष्का आनंदा वाकुर्डे हिने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या कुटुंबासह परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सवादे येथे झाले तर माध्यमिक शिक्षण यशवंत हायस्कूल कराड येथे झाले. तिचे वडील संजीवनी प्राथमिक विद्यामंदिर बनवडी येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आई गृहिणी आहे. मराठी माध्यमात शिकून सुद्धा तिने हे यश संपादन केल्याने तिचे कौतुक होत आहे.

कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर अनुष्काने ही यशस्वी कामगिरी केली. सीए ही देशातील सर्वात आव्हानात्मक व्यावसायिक परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेत यश मिळवून अनुष्काने



आपल्या ध्येयपूर्तीकडे एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. तिच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक आणि मित्रपरिवार यांनी तिचे अभिनंदन केले असून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अनुष्काच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

शिक्षण मंडळ बनवडीचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव खापे, उपाध्यक्ष किशोर पाटील, सचिव विनायक माळी, खजिनदार कांतीलाल पाटील सर्व संचालक मंडळ सदस्य व जागृती विद्यामंदिर बनवडीचे मुख्याध्यापक सुधाकर चव्हाण तसेच सवादे व बनवडी गावचे ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## पाणी उपसाबंदी आदेश शिथिलचे आदेश

**मसूर (हॅलो न्यूज)**

गतवर्षी १५ मे २०२५ पासून ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्रात मुबलक प्रमाणात पाऊस झाला, धरणे १०० टक्के भरलेली होती, परंतु जलसंपदा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेकडून योग्य नियोजन न झाल्याने धरणातील पाणी अतिरिक्त सोडण्यात आले, परिणामी धरणातील पाणीसाठा कमी झाला, या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने कृषी पंप व सहकारी पाणीपुरवठा



संस्थांना नदीतील पाण्याचा उपसाबंदी आदेश जाहीर केला होता, या विरोधात माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन व सह्याद्रि सहकारी साखर कारखाना पुरस्कृत सहकारी पाणीपुरवठा संस्थांच्यावतीने जलसंपदा विभागाने जाहिर केलेला पाणी उपसाबंदी आदेश रद्द करण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी संतोष पाटील, अभियंता अभय काटकर, कार्यकारी अभियंता प्रगती यादव, महावितरणचे अधिक्षक अभियंता बाळासाहेब हाळनोर यांचेकडे सादर केले होते.

माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या मागणीवरून कृष्णा, कोयना, उरमोडी,तारळी, कुडाळी, वेण्णा, वांग व उत्तरमांड आदी नद्यांवरील उपसा बंदी शिथील करण्याचे आदेश दिले आहेत. माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी तातडीने केलेल्या पाठपुराव्यामुळे सदरचा उपसा बंदी आदेश शिथिल करण्यात आल्याने शेतकरी बांधवांनी आभार व्यक्त केले.

# कवीवर्य उमेश सुतार यांना राष्ट्रीय आदर्श कवीभूषण पुरस्कार प्रदान

**कराड (हॅलो न्यूज)**

देखणे ते हात त्यांना निर्मितीचे डोहाळे या उक्तीप्रमाणे साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार आणि समाजाभिमुख लेखन करणारे कवीवर्य उमेश सुतार यांचे कार्य उल्लेखनीय असून ग्रामीण भागातील साहित्यिकांसाठी ते प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते, लेखक डॉ. प्रकाश कदम यांनी केले.

कोल्हापूर येथे कै. बसवंत नागू शिंगाडे चॅरिटेबल ट्रस्ट, बेळगाव यांच्या वतीने आयोजित ''नॅशनल एक्सलन्स गोल्ड स्टार अवॉर्ड २०२६'' या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात कविवर्य उमेश सुतार यांना ''आदर्श कवीभूषण'' या राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अनाथांची माऊली डॉ. कल्पना इनामदार होत्या. विशेष उपस्थिती म्हणून सनदी लेखापाल, लेखक, कवी प्रा. डॉ. शंकर अंदानी, ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विक्रम शिंगाडे, अँड प्रिती कोळी, अशोककुमार आसोडे, डॉ. शितल खेत, कवी विवेक जोशी, प्रा. डॉ.



मारुती पाटील, सुजय देसाई, डॉ. सविता अहिरे, डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. प्रल्हाद बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# एकल महिलांच्या उन्नतीसाठी कराड पंचायत समिती कटिबद्ध: उपसभापती अनिता वेताळ

**कराड (हॅलो न्यूज)**

तालुक्यातील एकल महिलांच्या उन्नतीसाठी कराड पंचायत समिती कटिबद्ध असून त्यांना शासकीय योजनेची माहिती देणे, रोजगार व स्वयंरोजगार संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना बचत गटांशी जोडणे यावरती विशेष भर दिला जाणार आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण करून त्यांच्या समस्यांची नोंद घेत त्यावरती उपाय योजनेसाठी ही पंचायत समिती पाउले उचलणार असल्याचे प्रतिपादन उपसभापती सो.अनिताताई वेताळ यांनी केले.



यशवंतराव चव्हाण सभागृह (बचत भवन) येथे कराड पंचायत समिती, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांच्यावतीने एकल महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य सौ.विजयाताई थोरात, सौ.विद्याताई वेताळ, सौ.सुनंदाताई पाटील, पंचायत समिती सदस्य संग्रामबाबा पवार, सिध्दार्थ चव्हाण, रविंद्र बडेकर, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, ज्ञानदीप संस्था अध्यक्ष आनंदा थोरात, वैद्यकीय अधिकारी डॉ.मैथिली मिरजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपसभापती सौ.वेताळ म्हणाल्या, पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रथमच कराड तालुक्यामध्ये ज्ञानदीप सामाजिक संस्थेने एकल महिलांसाठी केलेले संघटन हे प्रेरणादायी आहे. मधुराणी थोरात यांनी एकल महिलांचे प्रश्न आणि त्यासाठी केलेले सेवाकार्य आपण सर्वांनी पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने ही याबाबत घेतलेले धोरणात्मक निर्णय हे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्वपूर्ण आहेत.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सौ.विद्याताई वेताळ, सौ.विजयाताई थोरात, संग्रामबाबा पवार यांनी आपल्या मनोगतामध्ये एकल महिलांचे प्रश्न मांडत समाजातील प्रत्येक महिलेला सन्मानाने जगण्याचा अधिकार असून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनाचे लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र महिलेपर्यंत पोहोचवला पाहिजे, असे आवाहन केले.

एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश विभुते यांनी स्वागत केले. सहाय्यक अधिकारी प्रतिभा लोंढे यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

# कृष्णेत २१-० ऐतिहासिक विजय : सहकार पॅनेलला १४ हजार ५०० हून अधिक मताधिक्य

**रेठरे बुद्रुक (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत जयवंतराव भोसले सहकार पॅनलने तब्बल १४ हजार ५०० हून अधिक विक्रमी मताधिक्याने ऐतिहासिक विजयाची हॅट्रिक साधली. या देदीप्यमान विजयामुळे कारखाना परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, कार्यकर्त्यांनी कारखाना कार्यस्थळावर चेअरमन डॉ. सुरेश भोसले आणि विनायक भोसले यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.



कृष्णा कारखान्याच्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीच्या निकालात चेअरमन डॉ. सुरेश भोसले आणि आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या नेतृत्वाखालील जयवंतराव भोसले सहकार पॅनलने सर्व २१ जागांवर दणदणीत विजय मिळवत विरोधी संस्थापक पॅनलचा धुव्वा उडवला. या ऐतिहासिक यशानंतर कारखाना परिसरात कार्यकर्ते, सभासद आणि समर्थकांनी एकच जल्लोष केला. दरम्यान, आज सकाळी चेअरमन डॉ. सुरेश भोसले व श्री. विनायक भोसले यांचे कारखाना कार्यस्थळावर आगमन होताच त्यांचे स्वागत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली. फटाक्यांची आतषबाजी, घोषणाबाजी आणि अभिनंदनाच्या वर्षावात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

नवनिर्वाचित संचालक बाबासो शिंदे, छबन कांबळे, संग्राम पाटील, बाजीराव थोरात, सत्यजित पाटील, बाळासो जगताप, माजी संचालक संजय पाटील, विलास भंडारे, दिलीप पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे संजय पाटील, महिला जिल्हाध्यक्ष सुश्मिता जाधव, कराड पं. स. सभापती नंदाताई यादव, जिल्हा परिषद सदस्या शैलजा शिंदे, कराडच्या माजी नगराध्यक्ष रोहिणी शिंदे, शिवाजीराव थोरात, राजेंद्र माने, प्रकाश पाटील, प्रकाश देसाई, धनाजी जाधव, रमेश मोहिते, कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर सी. एन. देशपांडे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, एम. के. कापूरकर यांच्यासह कराड, वाळवा व कडेगाव परिसरातील कार्यकर्ते व शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पश्चिम सुपनेतील हिम्मतराव पाटील यांना शासनाचा ''वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार'' जाहीर

**कराड (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिला जाणारा राज्य पातळीवरील अत्यंत मानाचा ''वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार'' कराड तालुक्यातील पश्चिम सुपने येथील हिम्मतराव हिंदुराव पाटील यांना जाहीर झाला आहे. या कृषी पुरस्काराचे वितरण १ जुलैला कृषीदिनी मुंबई येथील डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे होणार आहे.

या पुरस्काराचे वितरण राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील, मंत्री भरतशेठ गोगावले, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक आदींच्या उपस्थित पुरस्कार वितरण होणार आहे.

हिम्मतराव पाटील यांनी आपल्या शेतीमधील सातत्यपूर्ण प्रयोगशीलता, अथांग परिश्रम आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांमुळेच आज साताऱ्याच्या शिरपेचात हा मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्र शासनाने २०२४ सालचे पुरस्कार जाहीर केले असून कराडच्या या शेतकरी पुत्राचा गौरव होणार असल्याने कृषी विभाग, शेतकरी मित्र तसेच परिसरातील लोकांनी त्यांचे अभिनंदन केले.

सातारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे पवार, कराडचे उपविभागीय कृषी अधिकारी समीर पवार, तंत्र अधिकारी रियाज मुल्ला, कराडचे तत्कालीन तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय खरात यांनी अभिनंदन केले. तर तालुका कृषी अधिकारी प्रशांत शेंडे, मंडल कृषी अधिकारी ओंकार बर्गे, उप कृषी अधिकारी विनोद पुजारी, सहाय्यक कृषी अधिकारी मंगला साळुंके, सहाय्यक कृषी अधिकारी धनश्री होवाळ यांनी हिम्मतराव पाटील यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

# जी एच रायसोनी बॅडमिंटन चैम्पियनशिप- कराडच्या शटलर्स ॲकडमीच्या खेळाडूंचे मोठे यश

## श्रध्दा इंगळे दुहेरी मुकुटची मानकरी, श्रीयांश फणसळकर मुले एकेरीतील विजेता

**सातारा (हॅलो न्यूज)**

जिल्हा बॅडमिटन संघटनेच्या वतीने आयोजित जी एच रायसोनी मेमोरियल सातारा जिल्हा बॅडमिंटन चैम्पियनशिप २०२६ स्पर्धेत कराडच्या शटलर्स ॲकडमीच्या खेळाडूनी मोठे यश मिळवले. या स्पर्धा वेगवेगळ्या वयोगटात पार पडल्या. कराडमधील श्रध्दा इंगळे हिने दुहेरी विजयी मुकुट मिळवला तर श्रीयांश फणसळकर मुले एकेरीतील तर ओमकार पालकर पुरूष दुहेरीतील विजेते ठरले.

करा‍डच्या शटलर्स विजेत्या खेळाडूची कामगिरी पुढीलप्रमाणे - श्रद्धा इंगळे, (दुहेरी मुकुट) मुली एकेरी १५ वर्षा खालील आणि मुली एकेरी १७ वर्षा खालील विजेती ठरली. श्रीयांस फणसळकर हा मुले एकेरी १९ वर्ष खालील विजेता ठरला. ओमकार पालकर हे पुरुष एकेरी उपविजेता तर पुरुष दुहेरी विजेते ठरले. पुष्कराज कुलकर्णी पुरुष दुहेरी विजेता ठरला आहे.

निलेश फणसळकर आणि अतुल पाटील यांना पुरुष दुहेरीत उपविजेता पदावर समाधान मानावे लागले. पूर्वा कुलकर्णी महिला एकेरीत उपांत्य फेरीत पोहचली होती. हर्ष पाटील, राजवीर डुबल, वरद कोल्हापूरे, कनक जोशी, अक्षत निकम हे खेळाडूनी उपांत्य पूर्व फेरीपर्यंत मजल मारली.




स्पर्धेतील खेळाडूंचे सातारा जिल्हा बॅडमिंटन असो. अध्यक्षा छ. वृषाली राजेभोंसले, उपाध्यक्ष राजदीप माजगावकर, सचिन देशमुख, सुरेश साधले, सचिव सुधाकर शानभाग, मनोज कान्हेरे, विलासराव भगत, नीलेश फणसळकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# जबरी चोरी करणाऱ्या पती-पत्नीस अटक

## कराड शहर पोलिसांची कारवाई : मुद्देमाल जप्त, आणखी तीन गुन्हे उघड

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड बसस्थानक परिसरात महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून जबरी चोरी करणाऱ्या पती-पत्नीला कराड शहर पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे १ लाख ५ हजार रुपये किमतीचे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमुळे आरोपींनी केलेले आणखी तीन गुन्हेही उघडकीस आले असल्याची माहिती डीवायएसपी राजश्री पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्रावण राजेश कांबळे (वय ३३) व त्याची पत्नी पूनम श्रावण कांबळे (वय २७, दोघे रा. कराड) अशी अटक करण्यात आलेल्या पती-पत्नीचे नाव आहे.

पुढे त्या म्हणाल्या, २२ जून रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास नवग्रह मंदिर ते एसटी स्थानकादरम्यान चालत जाणाऱ्या महिलेचा मार्ग अडवून जीवे मारण्याची धमकी देत तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावण्यात आले होते. याप्रकरणी कराड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि घटनास्थळाची पाहणी केली. त्यावरून संशयितांची ओळख पटवून श्रावण कांबळे व त्याची पत्नी पूनम कांबळे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी कराड हद्दीत आणखी तीन गुन्हे केल्याची कबुली दिली. त्या दोघांकडून गुन्ह्यातील १ लाख ५ हजार रुपये किमतीचे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे. पोलिसांकडून तीन गुन्ह्यातील उर्वरित मुद्देमालाचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, डीवायएसपी राजश्री पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे, गुन्हे प्रमुखचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय गोडसे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक निखील मगदूम, पोलीस हवालदार वसीम संदे, सतिश पाटील, संदीप कुंभार, सज्जन जगताप, अनिल स्वामी, धिरज कोरडे, मुकेश मोरे, दिग्विजय सांडगे, अमोल देशमुख, मोहसीन मोमीन, महेश पवार, निलेश विभुते, आनंदा जाधव, सोनाली पिसाळ यांनी केली.

